




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७६ ●मंगळवार,दि.०६ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# कितीही लाटले भूखंड तरी होत नाही वाकडा 'बाल'

## आणखी एका घोटाळ्यात अडकला 'अजित पवार'चा लाल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा जमिन गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी सुरू या प्रकरणात जो साक्षिदार आहे, त्याच व्यक्तीच्या संगनमताने राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांनी 'कल्पवृक्ष प्लांटेशन कंपनी'द्वारे परस्पर भूखंड लाटला आणि ३०० कोटींपेक्षा अधिक रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते विजय



कुंभार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. या भूखंडावर 'अनंत वन' हा प्रकल्प उभारण्यात आला असून तेथे 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन'चे कार्यालय स्थापन्यात आले असून प्रकल्पातील इतर मालमत्तांची थेट चालू बाजारभावमुल्यानुसार (रेडीरेकनर) विक्री करण्यात आली आहे. प्रामुख्याने मुंढवा जमीन घोटाळ्या पार्थ पवार आणि शीतल तेजवानी यांच्यामध्ये झालेल्या करारामध्ये साक्षीदार असलेला साहिल प्रधान आणि इतर सदस्यांची नावे या भूखंड घोटाळ्याच्या प्रकरणातही आढळून येत असल्याचे कुंभार यांनी सांगितले. कुंभार म्हणाले, 'पुण्यातील ▶ उर्वरित पान २ वर

### ● जागेवर २५ कोटींचे कर्जही


मुदतीनुसार भाडेतत्वावर जागा दिल्यानंतर संबंधित जागेवर कोणताही वित्त पुरवठा किंवा बँकेचे कर्ज काढता येत नाही. परंतु या जागेवर २५ कोटींचे कर्ज काढण्यात आले आहे. सन २०१७ पासून या जागेवर बांधकाम सुरू करण्यात आले आणि नुकतेच या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे त्याठिकाणी आलिशान कार्यालय सुरू झाल्यावर याबाबत कायदेशीर माहिती काढली असता धक्कादायक माहिती समोर आली. कल्पतरू प्लांटेशन कंपनी यांनी भाडे तत्वावर घेतलेल्या जागेचा काही भाग परस्पर विक्री केला आहे. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करणे गरजेचे आहे, असे कुंभार यांनी नमूद केले.

### ● महारेराच्या आदेशाला केराची टोपली

'महारेरा' यांनी देखील या जागेची चौकशी केल्यानंतर सर्व प्रकार समोर आल्याने हा प्रकल्प स्थगित ठेवण्यात यावा असे निर्देश दिले आहेत. तसेच प्रकल्पाचे बँक खाते गोठवत प्रवर्तकांनी प्रकल्पाचे अनुपालन पूर्ण करेपर्यंत प्रवर्तकास खरेदी सोबत साठेकरार आणि विक्री करार करण्यास मज्जाव असल्याच्या सूचना दिल्या. मात्र या ठिकाणी 'अनंत वन' हा प्रकल्प या ठिकाणी उभा केला असून शासनाच्या विरोधात लढणाऱ्या कंपनीच्या प्रकल्पांमध्ये राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या पक्षाचे कार्यालय असणे कितपत योग्य आहे, असेही कुंभार यांनी सांगितले.

## मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

### यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...



आज दि. ६ जानेवारी. वृत्तपत्रसृष्टीत ६ जानेवारी या तारखेला विशेष महत्व आहे. कारण आजपासून साधारणपणे १८३ वर्षांपूर्वी ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबई मध्ये 'दर्पण' या नावाने पाक्षिकास सुरूवात केली आणि तो मराठी वृत्तपत्रसृष्टीचा सुवर्ण दिन ठरला. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करून मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान मिळविला. त्यांची आठवण म्हणून आपण ६ जानेवारी रोजी दर्पण दिन साजरा करतो.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा फार मोठा वाटा होता.

कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून आपल्या कार्याचा ठसा १८३२ ते १८४६ या काळात उमटवला.

बाळशास्त्री जांभेकरांना आपण 'दर्पण'कार जांभेकर म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली. भविष्यकाळातील या माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकी सत्तेला उलथून टाकायचे असेल, तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही हे त्यांना फार पूर्वीच समजले होते. बाळशास्त्री कडवे देशाभिमानी होते. त्यांच्या या देशसेवा आणि समाजसेवेच्या जाणिवेतूनच दर्पणसारख्या नियतकालिकाचा जन्म झाला आणि मराठी वृत्तपत्रविश्र्वात नवी पहाट उगवली.

दर्पणाचा जन्म होताना गोविंद कुंटे व भाऊ महाजन यांचेही सहकार्य बाळशास्त्रींना लाभले. त्या वेळी बाळशास्त्रींचे वय अवघे वीस वर्षांचे होते. एका वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते.

दर्पणाचा पहिला अंक ६ जानेवारी, १८३२ रोजी प्रकाशित झाला. वृत्तपत्राची किंमत १ रुपया होती. जनसामान्यांसाठी वृत्तपत्राची भाषा मराठी ठेवण्यात आली असली तरी ब्रिटिश शासनापर्यंत आपला आवाज जावा या हेतूने, वृत्तपत्राचा एक स्तंभ इंग्लिश भाषेत असायचा. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर वृत्तपत्रात काय लिहिले आहे, हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी इंग्रजी मजकूर होता. वृत्तपत्राची संकल्पना त्या काळी लोकांना नवीन होती. त्यामुळे दर्पणचे वर्गणीदार सुरुवातीच्या काळात खूप कमी होते. पण हळूहळू लोकांमध्ये ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रीतीने साडे आठ वर्षे चालले आणि जुलै, १८४० ला त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. 'दर्पण' हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोकशिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला. यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रश्र्नाचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराचा करावा लागेल. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लिखाण केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन त्याचे रूपांतर पुढे विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले. ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजीत ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. देशाची प्रगती, आधुनिक विचार आणि ▶ उर्वरित पान २ वर

## ऊसतोड कामगारांच्या आर्थिक संरक्षण व अपघातातील आर्थिक संरक्षणाची योजना तातडीने कार्यान्वित करा: धनंजय मुंडे

**गोड उसाची कडू आणि दुःखद कहानी - ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अपघाती मृत्यू बाबत मुंडेंनी केले दुःख व्यक्त ; कुटुंबियांना एकटे पडू देणार नाही ; लवकरच डोंगरे कुटुंबियांची घेणार भेट - धनंजय मुंडे**

**परळी वै. । प्रतिनिधी**

वर्षातील सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ विस्थापित होऊन विविध अपघातांसह सर्पदंश सारखी अनेक जीवघेणी संकटे अंगावर घेत ऊस तोडणी चे जोखमीचे



काम करून इतरांची साखर गोड करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या कल्याणासह त्यांचे आर्थिक संरक्षण व अपघातांमध्ये त्यांना विम्याचे संरक्षण मिळावे याबाबत मी सामाजिक न्याय विभागाचा मंत्री असताना काही योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या, त्या योजना तातडीने कार्यान्वित करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी व ऊसतोड कामगारांना आर्थिक ▶ उर्वरित पान २ वर

### ● महामंडळाचे काम करण्यास सामाजिक न्याय विभाग उदासीन ?

दरम्यान लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची धनंजय मुंडे यांच्या मंत्री कार्यकाळात स्थापना, विविध योजनांचे प्रास्ताविक धनंजय मुंडे यांनी अत्यंत प्रगल्भतेने व वेगाने केले होते. मात्र मुंडे सामाजिक न्याय मंत्रीपदावरून पायउतार झाल्यानंतर महामंडळाचे काम पुन्हा एकदा मंदावले.

## बीड-तारांगण आणि विज्ञान केंद्र कामास प्रशासकीय मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

शहरात सुमारे २८ कोटी रुपये खर्च करून तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याची घोषणा पालकमंत्री उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केली होती. या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. अविज्ञान केंद्रात ४ महिती केंद्रांचा समावेश आहे. तारांगणामध्ये विविध ग्रह, तारे, उल्का, आकाशगंगा आदींबाबतची दुर्मिळ माहिती मातृभाषेत मिळणार आहे. प्रशासनाने धानोरा रस्त्यावरील 'पंढरी' येथील जागा या प्रकल्पासाठी निश्चित केली असून सुमारे १२ हजार चौमी क्षेत्रात साकारण्यात येणाऱ्या या तारांगणामध्ये चार प्रमुख माहिती केंद्रांचा समावेश असणार आहे. या कामाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १४ कोटी रुपये किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील काम सुरु होण्याचा मार्ग आता लवकरच सुकर झाला असल्याची माहिती



आमदार विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगताना दिली. यात खगोलशास्त्र व अंतराळ विज्ञान, नवोन्मेष व तंत्रज्ञान, पर्यावरण व शाश्वत विकास व सुश्रुत वैदक शास्त्र अशी चार प्रमुख दालनांचा समावेश यामध्ये असणार आहे. सर्व वयोगटातील अभ्यागतांना आकर्षित वप्रेरीत होऊन नवोदीत शास्त्रज्ञ निर्माण होण्यासाठीया प्रकल्पाचा भविष्यात लाभ होणार आहे. विविध ग्रह, तारे, उल्का, धुमकेतू, आकाशगंगा या बाबतची दुर्मिळ माहिती अत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून मातृभाषेत विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

## अंगावर काटा येईल असा थरार! मध्यरात्री दरवाजा तोडून घरात दरोडेखोर शिरले...

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या सराटेवडगाव येथे रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास दरोडेखोरांनी धुमाकूळ घातला. घराचा दरवाजा लाथ मारून तोडत आत शिरलेल्या ५ ते ६ अज्ञात दरोडेखोरांनी महिलांच्या गळ्यावर पाय देऊन आणि धारदार शस्त्राचा धाक दाखवून दोन भावांच्या कुटुंबांना लुटले. या भीषण घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सराटेवडगाव येथील शेळके वस्तीवर ग्यानबा राजपुरे आणि बाळू राजपुरे हे दोन भाऊ आपल्या




कुटुंबासह वास्तव्यास आहेत.

रविवारी त्यांच्या घरी चुलत्याचे वर्षश्राद्ध असल्याने नातेवाईक आणि पाहुण्यांसाठी जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दिवसभर पाहुण्यांची वर्दळ असल्याने कुटुंब थकलेले होते. रात्री सर्व आटपून दोन्ही कुटुंबे गाढ झोपेत होती. मध्यरात्री एक ते सव्वा एकच्या सुमारास अचानक पाच ते सहा अज्ञात दरोडेखोरांनी ग्यानबा राजपुरे यांच्या घराचा दरवाजा लाथा मारून तोडला. अचानक झालेल्या आवाजाने घरातील सर्वजण जागे झाले. ग्यानबा यांच्या आईने प्रतिकार करण्याचा किंवा ओरडण्याचा प्रयत्न केला असता, क्रूर दरोडेखोरांनी त्यांच्या छातीवर आणि गळ्यावर पाय देऊन त्यांना जमिनीवर दाबून धरले.

## 'ना खाउंगा, ना खाने दुंगा': अंबाजोगाई पालिकेत भ्रष्टाचाराला थारा नाही

**तक्रारीसाठी नगराध्यक्ष मुंदडांनी जाहीर केला वैयक्तिक मोबाईल क्रमांक**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नगर परिषदेत कामासाठी येणाऱ्या नागरिकांची पैशांसाठी अडवणूक होऊ नये आणि पारदर्शक कारभार व्हावा, यासाठी नूतन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगर परिषद कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन कामासाठी पैशांची मागणी केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी गैरप्रकार आढळल्यास थेट आपल्याशी संपर्क साधण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे. नगर परिषद प्रशासनात पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने नगराध्यक्षांनी एका विशेष सूचनेद्वारे नागरिकांना आश्वस्त केले आहे. अनेकदा शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना कामासाठी चकरा माराव्या लागतात किंवा काही वेळा पैशांची मागणी केली जाते, अशा तक्रारी समोर येतात. हे टाळण्यासाठी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी ही कडक भूमिका घेतली आहे. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, कार्यालयातील कोणत्याही कामासाठी कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने पैशांची मागणी केल्यास किंवा कामात अडवणूक केल्यास नागरिकांनी न डगमगता त्यांच्याशी थेट संपर्क साधावा. या मोहिमेमुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत होईल आणि नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नगराध्यक्षांनी आपला वैयक्तिक मोबाईल क्रमांक ९४२२२४०५२३ सार्वजनिक केला असून, तक्रारदारांनी थेट संवाद साधण्याचे आवाहन केले आहे. या निर्णयाचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, यामुळे प्रशासकीय कामात अधिक शिस्त आणि पारदर्शकता येण्याचीशक्यतावर्तवण्यातयेतआहे.

## आष्टी तालुक्यात भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील कडा-लिंबोडी रस्त्यावर सोमवारी (दि.५) दुपारी एका भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अनिल मोहन खिलारे (वय ४५, रा. सांगवी पाटण) असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. अनिल खिलारे हे सोमवारी दुपारी कडा शहरातून आपल्या दुचाकीवरून (क्रमांक चक २३ -घ ११३३) गावाकडे निघाले होते. पाचेवस्ती जवळ आले असताना त्यांच्या दुचाकीला भीषण ▶ उर्वरित पान २ वर













# ६ जानेवारी 'दर्पण दिन' ; पत्रकार दिन


आचार्य बाळशास्त्री जांभेकर

## मराठी पत्रकारितेच्या इतिहासात दीपस्तंभ हा दिवस...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेचा क्रांतिकारक आवाज, आजच्या काळात पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्या देण्याचे माध्यम राहिलेले नाही, तर ती समाजाचे आरसेपण जपणारी एक जबाबदार शक्ती आहे. पत्रकार दर्पण दिनानिमित्त जेव्हा आपण पत्रकारितेचा विचार करतो, तेव्हा भारतीय पत्रकारितेतील एक अत्यंत तेजस्वी, निर्भीड आणि समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेला अध्याय आपल्यासमोर उभा राहतो,

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता – डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ संविधानकर्ते, समाजसुधारक किंवा अर्थतज्ज्ञ नव्हते, तर ते शोषितांच्या वेदनांना शब्द देणारे महान पत्रकार होते. ज्या काळात वंचित समाजाचा आवाज दाबला जात होता, त्या काळात बाबासाहेबांनी पत्रकारितेला शस्त्र बनवले आणि अन्यायाविरुद्ध लढा उभारला, पत्रकारितेचा उद्देश सत्य आणि समता डॉ बाबासाहेबांसाठी पत्रकारिता म्हणजे केवळ माहिती देणे नव्हते, तर सत्य उघड करणे, अज्ञान दूर करणे आणि समतेची जाणीव निर्माण करणे होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली वर्तमानपत्रे इ स (१९२०) मुखनायख, इ स १९७२ बहिस्कृत भारत, इ स १९२८ समता, प्रबुद्ध भारत ही केवळ पत्रे नव्हती, तर दलित, कामगार, शेतकरी आणि उपेक्षित समाजाची हाक होती. निर्भीड लेखणी, न झुकणारी मान होती, डॉ बाबासाहेबांची पत्रकारिता कोणत्याही सत्तेसमोर झुकली नाही. जातीव्यवस्था, सामाजिक अन्याय, धार्मिक अंधश्रद्धा, राजकीय दुटप्पीपणा यावर त्यांनी निर्भयपणे प्रहार केला. आर्थिक अडचणी, दबाव, टीका यांची पर्वा न करता त्यांनी सत्य लिहिले. हीच बाबासाहेबांची पत्रकारितेची खरी ताकद होती. आज पत्रकारितेवर बाजारूकरण, टीआरपी, दबाव, अफवा यांचे संकट आहे. अशा वेळी बाबासाहेबांची पत्रकारिता आपल्याला शिकवते की पत्रकाराने सत्तेचा नव्हे, सत्याचा साथीदार असावे. पत्रकारिता ही सेवेची आणि सामाजिक जबाबदारीची भूमिका निभावून वंचितांचा आवाज बनणे हीच पत्रकाराची खरी ओळख आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही केवळ इतिहासाचा भाग नाही, तर आज आणि उद्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. पत्रकार दर्पण दिनानिमित्त आपण सर्वांनी बाबासाहेबांच्या निर्भीड पत्रकारितेला वंदन करत, सत्य, समता आणि न्यायासाठी लेखणी उचलण्याची शपथ घ्यायला हवी. ज्या समाजाचा आवाज दाबला जातो, त्या समाजासाठी लिहिणे म्हणजेच खरी पत्रकारिता, हेच डॉ बाबासाहेबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

**– पत्रकार डॉ सुरेश गांधले**

## मराठी पत्रकारितेचा आत्मा आणि समाजाचा आरसा

मराठी समाजाच्या वैचारिक इतिहासात सहा जानेवारी हा दिवस केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही ; तो विचार, विवेक आणि सत्यनिष्ठेच्या प्रदीर्घ प्रवासाचा मैलाचा दगड आहे . ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण प्रकाशित झाले आणि त्यातून मराठी पत्रकारितेचा औपचारिक जन्म झाला . या ऐतिहासिक कार्यामागे होते बाळशास्त्री जांभेकर – आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीचे शिल्पकार , समाजप्रबोधनाचे दीपस्तंभ आणि निर्भीड लेखणीचे आद्य पुरस्कर्ते .

दर्पण म्हणजे केवळ एक वृत्तपत्र नव्हते ; ते समाजाला स्वतःकडे पाहण्याचे साधन होते . अज्ञान , अंधश्रद्धा , सामाजिक अन्याय , जातिभेद , प्रशासकीय जुलूम आणि परकीय सत्तेची दडपशाही – या साऱ्यांवर प्रश्न विचारण्याची धैर्यशील परंपरा दर्पणने सुरू केली . त्या काळात इंग्रजी सत्तेखाली दबलेला समाज , शिक्षणापासून वंचित घटक आणि बदलाची आस धरलेली तरुण पिढी – या सर्वांना दर्पणने शब्द दिले . पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी देणे नव्हे ; तर समाजाला जागं करणे , प्रश्न विचारायला शिकवणे आणि सत्याची बाजू ठामपणे मांडणे – ही जाणीव बाळशास्त्री जांभेकरांनी पहिल्याच पानावरून समाजाला दिली. स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रे ही केवळ माहितीची साधने नव्हती ; ती स्वातंत्र्यलढ्याची शस्त्रे होती . लोकमान्य टिळकांचे केसरी आणि मराठा , गोपाळ गणेश आगरकरांचे सुधारक , महात्मा फुल्यांचे दीनबंधू , महात्मा गांधींचे यंग इंडिया आणि हरिजन , डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक , बहिष्कृत भारत आणि जनता – ही वृत्तपत्रे म्हणजे केवळ छापील कागद नव्हते ; ती विचारांची रणमैदाने होती . या वृत्तपत्रांनी जातिभेदाला आव्हान दिले , स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली , शोषितांचा आवाज बनले आणि स्वातंत्र्याची जाणीव सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचवली .




त्या काळात वृत्तपत्र वाचणे म्हणजे एक सामाजिक कृती होती . गावात एखादे वृत्तपत्र आले की ते चौकात , वाचनालयात किंवा चहाच्या टपरीवर वाचले जाई . एकजण वाचायचा आणि अनेक जण ऐकायचे . शब्द पसरायचे , विचार रुजायचे आणि समाज हलायचा . वृत्तपत्रांनी भारतीय समाजमन घडवले , राजकीय जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ दिले .

स्वातंत्र्यानंतर पत्रकारितेचा चेहरामोहरा बदलत गेला . प्रशासन , विकास , शिक्षण , आरोग्य , शेती , उद्योग , अर्थकारण , न्यायव्यवस्था – या सर्व क्षेत्रांवर लक्ष ठेवणारी चौकशी पत्रकारिता विकसित झाली . ग्रामीण प्रश्न , दुष्काळ , पाणीटंचाई , शेतकरी आत्महत्या , कामगारांचे प्रश्न – हे विषय मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम वृत्तपत्रांनी केले . मराठी पत्रकारितेने समाजाशी असलेली नाळ टिकवून ठेवली .

आजच्या काळात माध्यमविश्व प्रचंड वेगाने बदलले आहे . छापील वृत्तपत्रांबरोबरच दूरचित्रवाणी , वृत्तवाहिन्या , डिजिटल माध्यमे , संकेतस्थळे , समाजमाध्यमे – माहितीचे असंख्य प्रवाह निर्माण झाले आहेत . भारतात सध्या सुमारे वीस हजारांहून अधिक नोंदणीकृत वृत्तपत्रे प्रकाशित होत आहेत . मराठी भाषेतील दैनिके आणि साप्ताहिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे . वाचकसंख्या स्वरूप बदलत असली , तरी वृत्तपत्रांवरील विश्वास आजही टिकून आहे .

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी बातम्यांचा वेग वाढवला , तर डिजिटल माध्यमांनी पोहोच वाढवली . मात्र या वेगाच्या काळात सत्य , तपासणी आणि जबाबदारी यांचे महत्त्व अधिक वाढले आहे . अफवा , अर्धसत्य , सनसनाटीपणा आणि व्यावसायिक स्पर्धा – या आव्हानांमध्ये पत्रकारितेचा आत्मा जपणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे .

दर्पण दिन आपल्याला आठवण करून देतो की पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही ; ती एक सामाजिक बांधिलकी आहे . लेखणी ही तलवारीपेक्षा धारदार असते , पण तिचा वापर विवेकाने व्हायला हवा . सत्य , निर्भीडपणा , लोकहित आणि सामाजिक जबाबदारी – या मूल्यांवर उभी असलेली पत्रकारिताच समाजाचा खरा आरसा ठरते . बाळशास्त्री जांभेकरांनी पेटवलेली ही विचारांची ज्योत आजही मराठी पत्रकारितेतून उजळत आहे , आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत अखंडपणे जपण्याची जबाबदारी आपली आहे .

आज दर्पणकडे पाहताना आपण स्वतःकडे पाहायला शिकले पाहिजे . आपण सत्यासाठी उभे राहतो का ? अन्यायावर प्रश्न विचारतो का ? दुर्बलांचा आवाज बनतो का ? या प्रश्नांची उत्तरेच दर्पण दिनाचा खरा अर्थ ठरवतात . कारण पत्रकारिता जिवंत असते तोपर्यंतच लोकशाही जिवंत राहते .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

## दर्पण दिन : सत्य, निर्भयता आणि लोकशाहीचा आरसा




दरवर्षी ६ जानेवारी रोजी साजरा होणारा दर्पण दिन हा केवळ पत्रकारांचा उत्सव नाही, तर समाजाच्या विवेकबुद्धीचा सण आहे. मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. त्या काळात समाजाला जागं करण्याचं, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचं आणि ज्ञानाचा प्रकाश पसरवण्याचं जे कार्य दर्पणने केलं, तेच कार्य आजच्या पत्रकारितेकडूनही अपेक्षित आहे.

पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्यांची मांडणी नाही ; ती सत्याचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे. सत्तेच्या केंद्रांपासून ते समाजाच्या तळागाळापर्यंत घडणाऱ्या घटना निर्भयपणे लोकांसमोर मांडणं, ही पत्रकाराची खरी ओळख. दबाव, प्रलोभनं आणि भीती यांवर मात करून सत्य लिहिणं हेच पत्रकारितेचं नैतिक बळ आहे.

लोकशाहीमध्ये विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्यासोबत माध्यमं हा चौथा स्तंभ मानला जातो. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणं, जनतेच्या समस्या मांडणं आणि उत्तरदायित्व निश्चित करणं–या साऱ्या भूमिका पत्रकारितेमुळेच शक्य होतात. म्हणूनच स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिता ही लोकशाहीची गरज आहे.

डिजिटल युगातील आव्हानं

आजच्या डिजिटल युगात माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. सोशल मीडियामुळे बातम्या क्षणार्धात पोहोचतात ; मात्र त्यासोबत अफवा, अर्धसत्य आणि खोटी माहिती यांचं आव्हानही उभं राहिलं आहे. या पार्श्वभूमीवर तथ्य पडताळणी, विश्वासार्ह स्रोत आणि संतुलित मांडणी यांना अधिक महत्त्व प्राप्त झालं आहे. 'पहिलं देण्याच्या' स्पर्धेपेक्षा 'योग्य देण्याची' जबाबदारी महत्त्वाची ठरते. पत्रकारितेने केवळ सत्तेवरच नाही, तर समाजावरही आरसा धरावा लागतो. शोषित, वंचित आणि दुर्लक्षित घटकांचे प्रश्न मांडणं, स्त्री–सन्मान, पर्यावरण, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या विषयांना प्राधान्य देणं–ही काळाची गरज आहे. संवेदनशील आणि मूल्याधिष्ठित पत्रकारिताच समाजाला दिशा देऊ शकते.

दर्पण दिन हा आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आजच्या पत्रकारितेने बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांची आठवण ठेवत सत्य, निर्भयता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना अग्रक्रम द्यावा. कारण जेव्हा पत्रकारिता प्रामाणिक असते, तेव्हाच समाजाला स्वतःचं खऱ्या अर्थानं प्रतिबिंब दिसतं.

**– शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

◆ पान ९ वरून पुढे...

### कितीही लाटले...

शिवाजीनगर येथील सुमारे दोन एकरचा भूखंड धर्मादाय आयुक्तालयाकडून ६० वर्षाच्या दीर्घ मुदतीवर कल्पतरू प्लांटेशन कंपनीला देण्यात आला. कालांतराना या ठिकाणच्या १५ हजार चौरस फूट जागेवर चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) वाढवून ६३ हजार चौरस फुटांचे बांधकाम असलेली इमारत उभारण्यात आली. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) नोंदणी क्रमांक पी ५२१०००१४४९४ या क्रमांकाद्वारे याची नोंदही उपलब्ध आहे. वास्तविक धर्मादाय ट्रस्टची जागा भाडेपट्ट्याव देण्यात आली असताना या जागेची डेक्कन शुगर आणि पुन्हा कल्पतरू प्लांटेशन असे हस्तांतरण दाखविण्यात आले. तसेच जागा विक्री करण्याचा कोणताही अधिकार नसताना संबंधित कंपनीने या जागेवरील सहा मजले परस्पर विक्री करण्यात आले आहे. ज्याची किंमत ३०० कोटींपेक्षा जास्त आहे.'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन या संस्थेची जागा विकसित करण्यासाठी संस्थेने साहिल प्रधान या व्यक्तीला 'कुलमुखत्यार' देण्यात आले. प्रधान ही व्यक्ती मुंढवा जमिन घोटाळा प्रकरणात अमेडिया कंपनी आणि शितल तेजवानी यांच्यात जो करार झाला त्या व्यवहारांत साक्षिदार आहे. त्यामुळे या प्रकरणात पार्थ पवार यांचा या प्रकरणात सहभाग दिसून

◆ पान ९ वरून पुढे...

येत आहे. या जागेसाठी निविदा प्रक्रिया राबवताना दौंड शुगर लिमिटेड, जय ग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि कल्पवृक्ष प्रायव्हेट लिमिटेड या उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी संबंधित तीन कंपन्यांच्याच निविदा येणे, त्यापैकी कल्पवृक्ष कंपनीला अंतिम निविदा मंजूर होणे, कंपनीने थेट जागा विकसित करणे हा योगायोन नसून ठरवून हा ठरवून भूखंड लाटण्याचा प्रकार आहे. कल्पवृक्ष प्लांटेशन कंपनीचे संचालक आणि खासदार सुनेत्रा पवार या इतरही कंपन्यांमध्ये एकत्रित संचालक आहेत.

### ऊसतोड कामगारांच्या...

व विम्याचे संरक्षण मिळवून द्यावे अशी मागणी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी राज्य शासनाकडे केली आहे. बीड जिल्ह्याच्या वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील रहिवासी असलेल्या ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांचा परवा धाराशिव जिल्ह्यातील एका साखर कारखान्याच्या प्रांगणात उसाचे भरलेले वाहन रिकामी करण्याच्या प्रतीक्षेत असताना ट्रॅक्टरचे उसाने भरलेले ट्रेलर अंगावर पडून झालेल्या अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. विशेष म्हणजे गणेश डोंगरे व त्याची पत्नी हे ऊस तोडणी करत असतानाच्या व्यथा अत्यंत हसत खेळत सोशल मीडियावर रीलच्या माध्यमातून मांडत असल्याने गणेश व त्याची पत्नी हे लोकप्रिय होते.

◆ पान ९ वरून पुढे...

गणेशच्या पत्नीचा अपघात स्थळी फेसबुक लाईव्ह सुरू असतानाच हा अपघात घडला, त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत असताना धनंजय मुंडे यांनी देखील या अपघाताबाबत एक्सपोस्ट करून दुःख व्यक्त केले आहे. गणेश डोंगरे यांचा मृत्यू म्हणजे गोड उसाची आणखी एक कडू आणि दुःखद कहानी असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले असून हा मृत्यू अत्यंत दुःखद व वेदनादायी असल्याचे म्हटले आहे. गरीब मात्र स्वाभिमानाने ऊस तोडणी करून आपल्या कुटुंबाचे निर्वाहन करणाऱ्या या बांधवाचे अकाली निधन झाल्यामुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून या कठीण परिस्थितीत त्याच्या कुटुंबाला आम्ही एकटे पडू देणार नाही असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. राज्य शासनाने मयत गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीसह लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून आर्थिक संरक्षण व त्याच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची लेखी स्वरुपात मागणी राज्य सरकारकडे करणार असून लवकरच डोंगरे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी कळविले आहे. महामंडळाच्या कार्यालयाच्या कामकाजात, ऊसतोड कामगारांच्या नोंदणी अभियानात तसेच निधी संकलनात देखील महामंडळाचे काम प्रचंड मागे पडले असून, मागील दोन वर्षांत एकही ठोस योजना कार्यान्वित नाही;

◆ पान ९ वरून पुढे...

त्यामुळे या महामंडळाचे काम सुरळीतपणे चालवण्यास सामाजिक न्याय विभागाची उदासीनता दिसत असून हे कामकाज उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाकडे वर्ग करावे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी याआधी देखील राज्य शासनाकडे पत्राद्वारे केलेली आहे. दरम्यान या घटनेनंतर राज्य सरकार धनंजय मुंडे यांच्या मागणीची दखल घेणार का ? आणखी किती ऊसतोड कामगारांना नाहक आपले जीव गमवावे लागणार ? असे अनेक प्रश्न आता अनुत्तरीत आहेत.

### आष्टी तालुक्यात...

अपघात झाला. हा अपघात एखाद्या अज्ञात वाहनाच्या धडकेने झाला की दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ते कोसळले, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. घटनेची माहिती मिळताच कडा पोलीस चौकीचे पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवासे आणि अमोल नवले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत. मयत अनिल खिलारे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, दोन मुले आणि दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलणाऱ्या अनिल यांच्या अचानक जाण्याने खिलारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### डॉ. ज्योती मेटे...

महिला, युवक व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. लोकहिताचे प्रश्न प्राधान्याने मांडणारे, जनतेशी थेट संवाद साधणारे व संघटनेशी प्रामाणिक राहणारे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले जातील, असे स्पष्ट करण्यात आले.

संघटन मजबूत करूया, परिवर्तन घडवूया हा नारा देत शिवसंग्रामच्या माध्यमातून सक्षम, अभ्यासू व जनतेसाठी लढणारे नेतृत्व उभे करण्याचा निर्धार डॉ. ज्योती मेटे यांनी यावेळी व्यक्त केला. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या विचारांना पुढे नेत विकासाभिमुख राजकारणातून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हा प्रशासन...

व लोकप्रतिनिधींचे वारंवार लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (रा. लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, रामधन जमाले, राजकुमार कदम डी.जी.तांदळे, नितिन जायभाये, डॉ.तांदळे, बाजीराव ढाकणे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे, राजेंद्र भिसे,शहाजी भुंबे,अंजाबापु अडागळे,कौसर कुरेशी,शालिंदा गरड,भारत भोमदळ, संतोष आडागळे,वचिष्ठ आठवे आदी पालक व ग्रामस्थ सहभागी होते. आंदोलनादरम्यान जिल्हाधिकारी जागे व्हा, पालकमंत्री अजितदादा जागे व्हा, आ. विजयसिंह पंडित जागे व्हा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना न्याय देण्यात दिरंगाई केल्याबद्दल संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी

◆ पान ४ वरून पुढे...

यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच तात्काळ अतिक्रमण हटवून रस्ता खुला करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. या आंदोलनाचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत पालकमंत्री अजित पवार व शिक्षणमंत्री दादा भुसे यांना देण्यात आले. आमच्या मुलांना न्याय द्या ; जिल्हाप्रशासनाचे दुर्लक्ष त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसण्याची वेळ आली: विलास कोरडे ( अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) दत्तनगर वस्तीशाळेची विद्यार्थी पटसंख्या ३४ असून, त्याच इमारतीत अंगणवाडी चालते व तेथे ६४ बालकांची नोंद आहे. सध्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाक, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वीज व पंखे यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. पालक व मुख्याध्यापकांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याची खंत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास कोरडे यांनी यावेळी व्यक्त केली.

### आष्टी मतदार...

विरोधात संताप व्यक्त होत आहे.या सर्व बाबी लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पुढील दोन दिवसांत बंधारे, रस्ते,पाझर तलाव व जलसिंचन विहिरींची दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.जर ठरलेल्या मुदतीत कामांना सुरुवात झाली नाही तर गुरुवार दि.८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा.आष्टी तहसील कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी बीड,उपविभागीय अधिकारी पाटोदा, पोलीस अधीक्षक बीड व पोलीस निरीक्षक आष्टी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

### चौसाळा पत्रकार...

◆ पान ४ वरून पुढे...

ग्रामसेवक पुरस्कार प्राप्त चौसाळा गावचे ग्रामसेवक बाबासाहेब आलू चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे तरी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चौसाळा पत्रकार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक एन. टी.वाघमारे, बळीराम राऊत, प्रसाद देशमुख, लहू नाईकवाडे, विकास सर्वज्ञ, खाजा मिया जागीरदार, मिराज मुलाने यांनी केले आहे.

### धर्मनाथ बीज...

शनिवारी कृष्णा महाराज चौरे पंढरपूर, १८ जानेवारी रविवारी श्रवण महाराज जगताप विसापूर, १९ जानेवारी चंद्रकांत महाराज खळेकर राहुरी, २० जानेवारी दुपारी ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांचे १२ ते ०२ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल नंतर महाप्रसाद होईल तसेच संध्याकाळी ह भ प रामायणाचार्य पदमकर महाराज देशमुख अमरावती यांचे कीर्तन होऊन रात्रभर हरिजागर व भारुड कार्यक्रम होईल तरी या हरी नामाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे

### तुकाराम राठोड ...

बध्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तुकाराम राठोड सर गेली २२ वर्षे सरकारखोरी तांडा शाळेची सेवा केली. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांना योग्य ज्ञान आणि कौशल्ये देण्यासाठी घालवले आहे. शिक्षकी पेशात ते नेहमीच प्रामाणिक, जबाबदार, आदरणीय आणि अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांना नेहमीच एक कुशल शिक्षक, उदार, सुशिक्षित आणि मनमोकळेपणाचे मानले. २०२५-२६ च्या शिक्षकांच्या प्रशासकीय बदलीमध्ये त्यांची बोरकढी येथे बदली झाली आणि दोन महिन्यांत त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.बीड येथील या भव्य शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळ्यास राज्याचे उपमुख्यमंत्री

◆ पान ४ वरून पुढे...

तथा अर्थमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार प्रकाश दादा सोळंके, आमदार सुरेश आण्णा धस, आमदार विजयसिंह राजे पंडित, आमदार संदिप भैय्या क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, पदाधिकारी कर्मचारी सहआदी मान्यवर उपस्थित होते.

### आदर्श भक्तीचे...

महत्व यावेळी विषद केले.या प्रसंगी केज मतदार संघाचे युवा नेते अक्षयजी मुंदडा,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे,माजी पंचायत समितीचे सदस्य दत्तात्रय ठोंबरे,ह.भ.प.सुनील महाराज देशमुख,ह.भ.प पुरुषोत्तम महाराज शास्त्री,ह.भ.प अरुण महाराज कदम,ह.भ.प सांजेकर गुरुजी,ह.भ.प अशोक महाराज ठोंबरे,ह.भ.प परमेश्वर महाराज सोन्नाखोटा,ह.भ.प दादा महाराज मेटे,ह.भ.प रामहरी काटकर, ह.भ.प.कल्याण सक्राते, ह.भ.प शिवराम महाराज,ह.भ.प राजन महाराज भोसले, डॉ.टि.ल देशमुख,धैर्यशील देशमुख,सकाळचे पत्रकार दत्ता देशमुख, प्रा. जगन्नाथ पटाईत आदींची उपस्थिती होती.काल्याची महाप्रसाद पंगत ह.भ.प बाबा महाराज वाघ यांची होती या सप्ताहात काकडा भजन,विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,रामायण कथा, हरिपाठ,हरीकिर्तन असे उपक्रम संपन्न झाले, रात्री ठीक आठ ते ११ दरम्यान साधू शिवराम पुरीजी महाराज यांच्या पालखीची मिरवणूक संपन्न झाली या मिरवणुकीत अरुण महाराज कदम व पुरुषोत्तम महाराज शास्त्री यांच्या गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पावले,फुगडी आदी खेळ मोठ्या उत्साहात पार पाडले शेवटी मंदिरात पालखीचे आगमन झाल्यावर आरती आणि प्रसाद वाटप केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्रीमंत भोसले,बळीराम देशमुख, बाबासाहेब पटाईत,काका जाधव,बाळू निर्मळ,दिलीप पटाईत आदींनी परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला जयंती उत्सव समितीने बीडमध्ये रचला इतिहास!



## विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाच्या आद्यजनक तथा महिलांच्या विविध प्रश्नांसाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बीड शहरामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे पहिल्यांदाच जयंतीनिमित्त महिलांची समिती स्थापन करण्यात आल्याने महिलांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे जयंतीनिमित्त एकाच वेशभूषेत असलेल्या महिला लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधले, तसेच उत्सव समितीच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम राबवून खऱ्या अर्थाने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण केली.

सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, स्त्री शिक्षण, आरोग्य व सामाजिक जागृतीला चालना मिळावी या उद्देशाने समितीने नियोजनबद्ध पद्धतीने उत्सवाचे आयोजन केले होते. उत्सवाच्या काळात महिलांनी पुढाकार घेत संपूर्ण कार्यक्रमांचे प्रभावी व्यवस्थापन केले. जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वृक्षरोपण तसेच सुप्रसिद्ध व्याख्याते व अभ्यासक डॉ. नागेश गवळी यांच्या व्याख्यानासह आदी कार्यक्रम राबवण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त भव्य सजविलेल्या रथांमधून प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये पारंपारिक पद्धतीने लेझीम पथकाने सादरीकरण केले. तर लहान मुला मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांची वेशभूषा करत मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. या जयंतीउत्सवा मध्ये महिलांनी अभूतपूर्व असा सहभाग नोंदविला होता. मिरवणुकीची सांगता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आली. यावेळी जयंती उत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. बीड जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक रूपाली हेमंत राऊत, द्वितीय क्रमांक डॉ. अन्विता चौधरी, तृतीय क्रमांक साक्षी बनसोडे ,उत्तेजनार्थ क्रमांक ऋचा फुलझळके ,मानसी काळे, रूपाली राऊत तर

रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अमृता काळे ,द्वितीय क्रमांक कांचन दुधाळ, तृतीय क्रमांक दिपाली वादे , उत्तेजनार्थ क्रमांक रेणुका गजदिवे , सुषमा भोपळे यांनी पटकावला होता. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा.विलास जाधव (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड), श्रीमती धरिणी कांडगिरे (यंत्र अभियंता), मा.डॉ.संजय राऊत (जिल्हा शल्य चिकित्सक), ए.पी.आय. मा.खेडकर साहेब, मा.डॉ.भोपळे, मा.तुकाराम जाधव (शिक्षण विस्तार अधिकारी), श्रीमती शशिकला किसनराव राऊत आदींची उपस्थिती होती. जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष सौ. अलका शिंदे (राऊत), उपाध्यक्ष सौ.साधना भोपळे, सचिव सौ. डॉ.वैशाली साळुंके, उपसचिव सौ.नंदा साळुंके, कोषाध्यक्ष सौ. पुजा लांडगे यांची उपस्थिती होती.

वेदांत काजळे, स्वराली साळुंखे, के.सी. चव्हाण, वसुदेव काजळे, नामदेव साळुंखे यांनी सुंदर स्वागतगीत सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. प्रियंका गोरे यांनी केले तर जयंती उत्सवाच्या अध्यक्ष अलका शिंदे (राऊत) यांच्यासह सौ.अश्विनी चौधरी, कु,जागृती आखाडे, यांनी मनोगत व्यक्त केले. सौ.छाया लांडगे, सौ.सीमा घाडगे, सौ.वर्षा लांडगे यांनी उत्कृष्ट लेझीम पथक तयार करत मिरवणुकीची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.प्रियंका काळे यांनी केले.या उत्सवासाठी

सौ.आशा गोरे,सौ.सावित्री साखरे, सौ.जयश्री दुधाळ, सौ.महानंदा शिंदे, सौ.मंदा राऊत, सौ.अलका जमदाडे,

सौ.रोहिणी घाडगे सौ. रूपाली राऊत सौ.वर्षा राऊत, सौ.स्वप्ना काळे, सौ.संध्या गोरे, सौ.उल्फा शिंदे, सौ.शीतल शिंदे, सौ.बेबीताई दुधाळ, सौ.मंगल लांडगे,सौ.राधा राऊत, सौ.पार्वती थोरात, सौ.साक्षी साळुंखे, सौ. सुरेखा भराटे, सौ.राजश्री राऊत, सौ.पूजा लांडगे, सौ.शिल्पा पानखडे, सौ.अश्विनी इंगळे, सौ.मीरा राऊत, सौ.लता गणगे, सौ.वैष्णवी गणगे, सौ.कांचन थोरात, सौ.लक्ष्मी आगरकर, सौ.मीना तुपे, सौ.पद्मा वादे, सौ. कौशल्या राऊत, सौ.वैशाली राऊत, सौ.कोमल राऊत, सौ. छाया जवंजाळ, अर्चना आखाडे आणि छाया राऊत यांच्यासह बीड शहरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्रियासाठी शिक्षण, समानता, स्त्री स्वातंत्र्य देणाऱ्या सावित्रीमाई यांचे समाज सुधारण्यासाठी महत्वपूर्ण योगदान

## धम्मदीप बुद्ध विहारात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची १९५ वी जयंती व पौष पौर्णिमा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

३ जानेवारी सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त व पौष पौर्णिमेच्या निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हूणन आशाताई बाजीराव खेमाडे व प्रमुख पाहुणे म्हणून डी. जी. वानखेडे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवारांच्या हस्ते दीप धुपाने आदर्शाचे पूजन करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आला. त्यानंतर त्रिसरण पंचशील घेऊन अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास परिसरातील बालिकांनी क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांची वेशभूषा साकारून



कार्यक्रमास उपस्थित होत्या त्या बालिकांचे मान्यवरांच्या हस्ते पुस्तक पेन व शालेय साहित्य देऊन सन्मान करण्यात आला तसेच आलेल्या महिलांचे बुद्ध विहार कमिटी कडून यथोचित पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर वेशभूषेतील मी सावित्री रुद्रानी रवींद्र लांडगे व मी सावित्री परी सचिन खेमाडे तसेच मी सावित्री अदिती संजय धनवे हिने सावित्रीबाई यांच्या जीवन चरित्रा बद्दल मनोगत व्यक्त केले. अंजली तेजस वडमारे यांनी आद्य शिक्षिका सावित्रीमाई जोतिबा फुले यांचे जीवन चरित्र सांगताना म्हणाल्या देशाच्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी साजरी केली जाते. आयु डी जी वानखेडे यांनी पौष पौर्णिमेचे बुद्ध धम्मातीलमहत्व समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोप करून सरंणत्तय ने कार्यक्रमाची सांगता झाली कार्यकमाचे आभार आयु वर्षाताई खेमाडे यांनी मानले व खेमाडे परिवाराकडून खीरदान केली. या कार्यक्रमास कोमल वाघमारे,राणी रवींद्र लांडगे, हौसाबाई वाघमारे, उर्मिला वडमारे, मालनबाई अंकुटे, शिवकन्या खेमाडे,जान्हवी वाघमारे,सांची वडमारे, ॲड तेजस वडमारे,राम वडमारे, विशाल वडमारे, रवींद्र लांडगे, अधिरा वडमारे, अदिती धनवे,परी खेमाडे,समृद्धी खेमाडे, संघर्ष वाघमारे, रमाबाई सोनवणे, सोनाली अंकुटे व बालक बालिका उपस्थित होते.

# 'दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन'च्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे जि.प. कन्या शाळा मध्ये माई सावित्रीबाई फुले यांची जयंती गेल्या ३५ वर्षापासून दलित मित्र एकबाल पेंटर हे स्वतः स्वखर्चाने दरवर्षी करत असतात. त्याच पद्धतीने यावर्षी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण वकृत्व स्पर्धा व समाजामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रा. मोहन परजणे सर यांना देण्यात आला. दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने अनेक उपक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात. यामध्येच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुला- मुलींचे भाषण स्पर्धेमध्ये अनेक मुलींना स्पर्धेचे बक्षीस



म्हणून महापुरुषांची पुस्तके व त्यांना स्टेज करिअर मिळण्यासाठी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रा.मोहन परजणे सर यांनी आपल्या मनोगतमध्ये मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले, गणेश कवडे यांनी बोलतांना सांगितले की, मराठी शाळेबरोबरच उर्दू शाळेच्या मुलींनी पण भाषणामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवल्या बद्दल कौतुक केले. एल आर जाधव सर बोलतांना सांगितले की, एकबाल पेंटर हे पाटोद्याचे भूषण आहे. दरवर्षी जयंती साजरी करतात त्यांचाआदर्श सर्वांनी घ्यावा,भाई विष्णुपंत घोलप यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांची जयंती आली की, आम्हाला पेंटर साहेबांची आठवण येते. कॉ. महादेव नागरगोजे, जाहेर पाटील, भाई विष्णुपंत घोलप ,एल.आर. जाधव , गणेश कवडे, हरीभगत सर, दिलीपराव गाडे, भगवानराव जावळे, देमा जावळे ,काळूशे सर, सय्यद इलियास, हादीसर, मुकरम बेग, नजान सर, खेडकर मॅडम, समिना बाजी,जबीन बाजी, तब्सुम बाजी,रफत बाजी,शेख फय्याज, सय्यद ईशरत, जावळे बाई, डिडुळ बाई ,बुद्रुक बाई , साठे, पारवे, सय्यद रेहान, सय्यद इम्रान, तसेच जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण नंतर शेवटी सर्वांचे आभार सज्जाद सय्यद यांनी केले.

# उपळी हायस्कूल उपळी येथे क्रांतीज्योती सावित्राबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी :

## विद्यार्थिनींनी केली सावित्रींची वेशभूषा





**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळे हायस्कूल उपळी येथे काल सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेमध्ये बालिका दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या सहशिक्षीका आदरणीय गायसमुद्रे मॅडम यांनी भूषवले प्रमुख पाहुणे पदी आदरणीय शेख मॅडम व आदरणिय सौंदरमल मॅडम होत्या , कार्यक्रम उत्साहात पार पडला प्रथम प्रतिमा पुजन करण्यात आले , त्यानंतर स्वागत गिते , मुला मुलींनी भाषणे , प्रश्नमंजुषा , रांगोळी स्पर्धा , वेशभूषा , या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला , आदरणीय सौंदरमल मॅडम यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार , त्यांचे जीवन व त्यांचा संघर्ष आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितला , शाळेचे मु.अ. बडे भागवत सर यांनी शाळेतील शिक्षिकांचे सत्कार केले , कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गोरे पि .आर . सरांनी केले , बालिका दिन या कार्यक्रमांमध्ये शाळेतील ज्या विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धा भाषण स्पर्धा चित्रकला स्पर्धा अंताक्षरी स्पर्धा या स्पर्धेमध्ये विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना शाळेचे माजी शिक्षक आदरणीय राऊत शिवशंकर सर व गोरे प्रकाश सर यांच्यामार्फत बक्षीस वितरण करण्यात आले हा कार्यक्रम व्यवस्थीत पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**आष्टी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर नेत्यांनीही यामध्ये रक्तदान करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. रक्तदान करून चालणार नाही ते गरजू पर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्यासाठी हे रक्तदान आयोजित केले होते खऱ्या गरजूवंतांना रक्त योग्य वेळी मिळून त्यांचा जीव वाचला



पाहिजे या हेतून दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केला जाते. याही वर्षी श्याम भाऊ माने मित्रपरिवार आष्टी तालुक्याच्या वतीने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला तर सतीश आबा शिंदे यांनी देखील कार्यकर्त्यांसोबत या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला स्वतः रक्तदान केले आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे सांगून इतरांनाही वर्षातून एकदा तरी रक्तदान करा असे आव्हान केले. या शिबिरासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे,

# बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले 'यांची जयंती साजरी



**शिरूर का. । प्रतिनिधी**

बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जांब जि.बीड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले 'यांची जयंती साजरी करण्यात आली विद्यालयाचे मुख्याध्यापक खाडे सर जामकर सर,मिसाळ सर,खेडकर सर यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री मोरे सर यांनी केले विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

# शिवकालीन वारसा: बावनबुरजी बचाव कृती समितीचा पुढाकार..

## जिजाऊ महोत्सवाच्या धर्तीवर आता करवंड महोत्सव: हरीरुद्र राजे ; कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्यभरातून व्यापक प्रतिसाद!

**बुलडाणा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे बुलढाणा जिल्ह्याचे जावई ही ओळख असपस्ट राहिली आहे. सिंदखेड राजाला राजांचे आजोळ तर ५२ बुरजी अर्थात करवंडला त्यांची सासरवाडी. छत्रपती घराण्यात दोन मुली देणाऱ्या करवंड गावचा इतिहास आजवर दुर्लक्षित राहिला.हा ऐतिहासिक ठेवा पुढे आणून शिवकालीन वारसा जतन करण्यात यावा यासाठी ५२ बुरजी बचाव कृती समितीने पुढाकार घेत जिजाऊ महोत्सवाप्रमाणे करवंड महोत्सव आयोजित करण्याचे ठरविले आहे. यासाठी महत्त्वपूर्ण बैठक ४ जानेवारी रोजी करवंड गढी परिसरात पार पडली. आठ जिल्ह्यातील शिवप्रेमी यावेळी उपस्थित राहिले. करवंड महोत्सव केवळ एक उत्सव नसून इतिहासाचा दडलेला ठेवा नवीन पिढी समोर ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे इंगळे



सरदार घराण्यातील हरिहरूद्र राजे यावेळी म्हणाले.

यावेळी उपस्थितांनी जिजाऊ जन्मोत्सवाच्या धर्तीवर करवंड महोत्सव यशस्वी करण्याचा संकल्प करून छत्रपती शिवाजी महाराज व गुणवंताराणीसाहेब यांच्या विवाह सोहळ्याची अनुभूती महोत्सवाच्या रूपाने महाराष्ट्राला पुन्हा एकदा करून देण्याचा निर्धार केला.यावेळी राजे हरिरूद्रप्रसाद इंगळे,चिखली पंचायत समितीचे माजी सभापती अरविंद देशमुख, महाराष्ट्र मराठा सोयरीक चे समन्वयक व करवंड महोत्सवाचे संकल्पक सुनिल जवंजाळ, आनंदी गृपचे समन्वयक प्राचार्य अन्नासाहेब म्हळसने, देऊळगाव राजा कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती गणेशराजे जाधव,जिजाऊ जन्मोत्सवाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. नाईकवाडे ,युद्धभूमी आसई ता. भोकरदन येथील सेवानिवृत्त डीवायएसपी. दिलीपराव पाटील इंगळे, प्रल्हाद पाटील इंगळे,दत्ताजी इंगळे बीड, शिव व्याख्याते कृष्णा पाटील इंगळे, माजी सभापती अंकुशराव वाघ, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲडव्होकेट विजय सावळे, पत्रकार राजेंद्र काळे, गणेश निकम केळवदकर, संदीप वानखेडे, युवराज वाघ, सोहम घाडगे,पप्पू राऊत, विनोद सावळे, विजय घ्याळ ,श्याम देशमुख इतिहास संशोधक रामेश्वर शेडगे, चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती मोहनराव जाधव, माजी सरपंच प्रकाश चव्हाण, भास्करराव आढळकर, मुख्याध्यापक राम इंगळे, नारायण सुर्वे,साभाष करंडे, सुनिल करंडे, जगदीश सपकाळ, पंढरीनाथ गुंजकर, प्रा.निलेश इंगळे, प्रा.डिगांबर कानडजे, रिसोड येथील बबनराव मोरे, डॉ. तेजराव नरवाडे, पोलीस पाटील विठ्ठल पीवळ प्रा. अनिल हेलगे, केज वरून आलेले दत्ताजी इंगळे, राजेंद्र रिंढे, संजय रिंढे, यांचेसह परिसरातील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

गेल्या काही दिवसापासून कृती समितीच्या माध्यमातून संकल्पक सुनील जवंजाळ पाटील यांच्या पुढाकारात शासन दरबारी पत्र व्यवहार देखील करण्यात आला आहे. सामाजिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर असणाऱ्या अरविंद बापू देशमुख यांनी या कामासाठी विशेषत्वाने पुढाकार घेतला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय घ्याळ यांनी केले तर आभार श्याम देशमुख यांनी मानले.

### ●देशमुख यांच्याकडून लाखाचा निधी

**महोत्सवासाठी निधी संकलनाचे काम सुरू असून शिवाजी शिक्षण संस्थेचे संग्राम देशमुख यांनी बैठकीमध्ये एक लाख पंधरा हजार रुपयांचा निधी दिला.पोलीस पाटील विठ्ठल पीवळ १५०००,प्रा. नाईकवाडे ११०००,डॉ. नरवाडे सावळी, ११११११, बबनराव मोरे, रिसोड ११०००,प्रा.राम जगन इंगळे ५०००,गणेशराव राजे जाधव, सि. राजा११०००,एकनाथराव देशमुख, करवंड ५०००,जगन्नाथ भांड करवंड ११११, वरील प्रमाणे निधी देण्याची घोषणा करण्यात आली.**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ ● पान ४

## थोडक्यात

### पन्नास हजार रुपयाचा धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपीस सहा महिन्याची शिक्षा व धनादेश रक्कमेसह ऐंशी हजार रुपयाचा दंड



**बीड । प्रतिनिधी**

घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी नामे अशोक तुकाराम टेके हे युवाशक्ती टि प्रोसेसर प्रा.लि. कंपनीचे डायरेक्टर असुन आरोपी नामे बाळु भगवानराव कवटकवार हा वैष्णवी पंतजली सेवा केंद्र चालवतो. फिर्यादी हे त्यांचा युवाशक्ती टि प्रोसेसर प्रा.लि. अंतर्गत ब्रँड युवाशक्ती चहा व लोटस गोल्ड चहा ई. प्रॉडक्ट विक्री करतात. आरोपीहा त्याचे वैष्णवी पंतजली सेवा केंद्र परभणी येथे फिर्यादीचे चहाच्या कंपनीकडे विक्री करावयास माल खरेदी करत असे त्याने सन २०१९ मध्ये रु.५०,०००/- किंमतीचा माल खरेदी केला व त्या देण्यापोटी आरोपीने त्याचे खाते असलेल्या देना बँक शाखा परभणी धनादेश क्र. ००१६०३ हा फिर्यादीचे हक्कात दिला. दिनांक २२.०४.२०१९ चा दिला. सदर धनादेश फिर्यादीने त्याचे खाते असलेल्या छत्रपती राजर्षी शाहु अर्बन को. ऑप.लि. बीड शाखा मार्केट यार्ड येथे वटवण्यास टाकला असता सदरचा धनादेश खात्यात अपुरी रक्कम या शेऱ्यासह परत आला.त्यानंतर फिर्यादीने विधीज्ञा मार्फत नोटीस पाठवली. सदर नोटीस मिळुन देखील आरोपीने फिर्यादीची रक्कम अदा केली नाही, म्हणुन फिर्यादीने मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांचे न्यायालयात कलम १३८ एन. आय. ॲक्ट प्रमाणे प्रकरण दाखल केले.सदर प्रकरणात फिर्यादी मार्फत दाखल केलेले कागदपत्रे व विधिज्ञाने केलेले युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांनी आरोपीस सहा महिने शिक्षा व धनादेशावरील रक्कमेसह तीस हजार रुपये दंड केला आहे. फिर्यादीतर्फे ॲड.अनिल व्ही. मेहेत्रे यांनी काम केले. त्यांना सहकार्य ॲड. सागर नाईकवाडे व ॲड. राजपुत यांनी केले.


### भावाने बहिणीला साडी घेतली, बहिनीनेही भावाला घेतला शर्ट!



**परळी वै. । प्रतिनिधी**

परळीतील मुंडे भाऊ बहिणीची जोडी ही महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणून ओळखली जाते. त्यांच्यातील गोड नाते, मधल्या काळातील राजकीय मतभेद आणि इतर प्रत्येक लहानात लहान बाब देखील या भाऊ बहिणींच्या संदर्भाने राज्यात चर्चिले जातात. या भाऊ बहिणींच्या जोडीने आज परळीतील एका दुकानात केलेली कपड्यांची खरेदी असाच एक चर्चेचा विषय बनली आहे! झाले असे की, परळी शहरातील तापडिया कुटुंबियांच्या कल्पना साडी व फॅमिली शॉपिंग मॉल या वस्त्र दालनाचे उद्घाटन आज सकाळी मंत्री पंकजाताई मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपूर्ण मॉल ची पाहणी करताना धनंजय मुंडे यांनी भगिनी पंकजा ताईंना आपण पूर्वी नेहमी आपल्या आवडीची साडी आणायचो, अशी आठवण काढत पंकजाताईंना साडी घेण्याबाबत आग्रह केला. क्षणातच धनुभाऊ यांनी पंकजाताई यांना आपल्या आवडीच्या साड्या खरेदी करून दिल्या आणि त्याचे नगदी बिलही दिले. पंकजाताईंनी देखील साडी खरेदी नंतर लागलीच आपल्या भावाला शर्ट खरेदी करून दिले. धनंजय मुंडे यांनी यावेळी आपल्या मनोगतात देखील आम्ही बहीण भावांनी या दालनाचे उद्घाटन प्रत्यक्ष खरेदी करून केले असल्याचे आवर्जून सांगितले. एकंदरीत भाऊ बहिणींच्या या खरेदीतून प्रेम बंधनाच्या भावना दिसून आल्याच्या चर्चा दिवसभर रंगल्या होत्या.

### माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्याच्या कार्यालयास कुलूप ठोकणार- सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड



**आष्टी । प्रतिनिधी**

वनक्षेत्र वनविभाग आष्टी या कार्यालयामार्फत आष्टी व पाटोदा तालुक्यातील कार्यालयाने शासनाकडून आलेल्या निधीचा अपव्यय करत अधिकाऱ्याने गैरवापर करून कामे न करताच निधी उचलल्याची शंका निर्माण झाल्याने माहितीच्या अधिकारात दोन वेळा माहिती मागवली परंतु माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने शेवटी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड यांनी दिला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की विभागीय वनपरिक्षेत्र अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आष्टी, पाटोदा, या तालुक्यातील वनक्षेत्र कार्यालयाकडे सन २०२३-२०२४-२०२५ मध्ये शसनाकडून आलेल्या निधीचा अधिकाऱ्याने गैरवापर करून कामे न करताच हडप केला का ? कारण दोन तीन महिन्यापासुन माहिती अधिकार मागणी अर्ज करूनही कोणतीही चौकशी किंवा माहिती देण्यात आलेली नाही त्यामुळे या काळात झालेल्या सर्व कामांची ईस्टीमेंट निहाय व विभागनिहाय गुणनियंत्रण तपासणी पथकामार्फत तपासणी करण्यात यावी. माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. आष्टी तालुक्यातील सर्व बिट निहाय कामाची चौकशी व स्थळ पहाणी करण्यात यावी. कामे पुर्णत्वाचे फोटो व कामे झाले नंतरचे फोटो शसनाकडून आलेल्या निधीचे किंवा कामाचे योजनेचे कोणतेही रेकॉर्ड दिसुन येत नाही. त्यामुळे संबंधीत तात्कालीन अधिकारी, गुत्तेदार तसेच अधिकाऱ्यांची पाठराखन करत आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे माहिती अधिकार व मागणी अर्ज व वरीष्ठ अधिकाऱ्यांचा पत्राला ना जुमानणाऱ्या, अधिकाऱ्यांना वारंवार प्रत्यक्ष भेटून वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशानुसार माहिती मला मिळावी यासाठी देण्यात आलेले पत्र चौकशी सबंधित विचारणा केली असता बोलण्यास टाळाटाळ करत आहे. दुर्लक्ष करणे दप्तर दिरंगाई कायद्याअंतर्गत वरील प्रमाणे जे अर्ज ज्या अधिकाऱ्यांकडे असतील त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

## डॉ. ज्योती मेटे यांनी घेतल्या जि.प, पं. स. निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

### लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**



आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्राम प्रणित लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या वतीने इच्छुक उमेदवारांची महत्वपूर्ण बैठक दि. ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता साक्षाळ पिंपरी ता. जि. बीड येथील श्री. नगद नारायण जिनिंग येथे पार पडली. या बैठकीत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी स्वतः इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या बैठकीस शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, नारायणराव काशीद, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, सुहास पाटील, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटूळे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, सुनील शिंदे,सुनील कुटे, मनिषा कुपकर, पंडित माने, ज्ञानेश पानसंबळ, माऊली शिंदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिरूर, गेवराई व बीड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या शिवसंग्रामच्या उमेदवारांचा सामाजिक सहभाग, संघटनात्मक कामगिरी, स्थानिक प्रश्नांची जाण, जनतेशी असलेला संपर्क तसेच पक्षविचाराशी असलेली निष्ठा या बाबींचा सखोल आढावा डॉ. ज्योती मेटे यांनी मुलाखतीदरम्यान घेतला.

बैठकीत आगामी निवडणुकांची रणनीती, बूथस्तरीय संघटन मजबूत करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रश्न, शेतकरी, ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींचा 'विवेक' जागा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

### दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांना तात्काळ न्याय द्यावा : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**





माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवन केंद्रीय जिल्हा परिषद शाळा अंतर्गत दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ आज सोमवार दि.०५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. दत्तनगर वस्तीशाळेसाठी २००७-०८ मध्ये सुसज्ज इमारत बांधण्यात आली असतानाही रस्त्यावर अतिक्रमण करून जाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली उघड्यावर शाळा भरवावी लागत आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासन ▶▶ उर्वरित पान २ वर



*श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती महंत ह.भ.प. शिवाजी (बाबा)महाराज यांनी पावन माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून नारायणगडावर मंगल आगमन केले. या शुभप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी त्यांचे दर्शन घेऊन मनोभावे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते*

## आष्टी मतदार संघातील बंधारे, रस्ते व पाझर तलाव दुरुस्ती करा अन्यथा गुरुवारी तहसीलसमोर धरणे आंदोलन : माजी आ. भीमराव धोंडे

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी विधानसभा मतदार संघात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे बंधारे, नदीवरील पूल,रस्ते, पाझर तलावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अद्यापही त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू झालेली नाहीत. या पार्श्वभूमीवर माजी आ.भीमराव धोंडे यांनी तहसीलदार आष्टी यांना पत्र देऊन ही कामे तातडीने दुरुस्त करावेत अन्यथा गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी आष्टी तहसील कार्यालयासमोर या मागणीसाठी बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिला आहे.

आष्टी,पाटोदा व शिरूर (का.) या तीनही तालुक्यांत अतिवृष्टीमुळे अनेक बंधारे व पाझर तलाव उद्ध्वस्त झाले आहेत.याचा थेट परिणाम परिसरातील शेती व पाणी साठवण क्षमतेवर होत असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. मात्र या गंभीर विषयाकडे संबंधित प्रशासन व जलसंधारण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप माजी आ. धोंडे यांनी केला आहे.महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या जलसिंचन व पाझर तलाव दुरुस्तीच्या कामांनाही अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. प्रशासनाच्या दिरंगाई ▶▶ उर्वरित पान २ वर

## चौसाळा पत्रकार संघातर्फे पाच मान्यवरांचा केला जाणार सन्मान

**चौसाळा । प्रतिनिधी**

स्वर्गीय बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आपण सर्वजण पत्रकारितेचा सन्मान म्हणून दर्पण दिन म्हणून साजरे करत आहोत तर पण दिनाचे औचित्य साधून चौसाळा पत्रकार संघातर्फे चौसाळा शहरातील प्रतिष्ठित नागरिक व अधिकारी यांचा सन्मान करण्यात येणार आहे भीमाशंकर शुगर मिलचे कार्यकारी संचालक प्रियदर्शनी महिला बँकेचे व सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेचे मार्गदर्शक स्वर्गीय सतीश लोढा यांचे चिरंजीव नितीन लोढा यांना उद्योग रत्न पुरस्कार देऊन सन्मानित येणार आहे तसेच मूळ गाव चौसाळा असलेले व गेल्या ५० वर्षापासून बीड शहरात अविरत रुग्णांची सेवा करणारे डॉक्टर पी.के.कुलकर्णी यांना चौसाळा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तसेच नेकनूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या कार्याची विशेष दखल घेऊन त्यांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल सन्मानित करण्यात येणार आहे तसेच महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार व गेल्या दहा वर्षापासून चौसाळा जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिकेची जबाबदारी अखंडितपणे पार पाडणाऱ्या पद्मजा हमपे व नुकताच जाहीर झालेला आदर्श ▶▶ उर्वरित पान २ वर

**नितीन लोढा उद्योग रत्न, डॉक्टर पिके कुलकर्णी चौसाळा रत्न, ए पी आय चंद्रकांत गोसावी उत्कृष्ट कार्याबद्दल विशेष सन्मानित,**

**महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका पद्मजा हंपे, महाराष्ट्र शासन आदर्श ग्रामसेवक पुरस्कार प्राप्त बी ए चव्हाण या सर्वांचा होणार विशेष सन्मान**

## धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह्यास उपस्थित रहावे: ह भ प शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज

### घाटसावली येथे भव्य दिव्य स्वागत सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



विसाव्या शतकातील महान संत वै. गुरुवर्य सद्गुरू किसान बाबा महाराज यांनी सुरू केलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे अमृत महोत्सवी ७५ वर्ष असून त्या निमित श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे महंत ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांचे घाटसावली ग्रामस्थांच्या वतीने भव्य दिव्य स्वागत सोहळा आयोजन करण्यात आले. धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे हे अमृत महोत्सवी वर्ष असून भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि.१३ जानेवारी ते २० जानेवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, गायक वादक, यांच्या उपस्थित पार पडणार आहे या निम्मित भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शांतीब्रह्म ह भ प गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे. दि १३ जानेवारी मंगळवारी रोजी संत महंत च्या व भाविकांच्या उपस्थित ठिक १२ वाजता फुल टाकून अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात होणार आहे. १३ जानेवारी मंगळवारी संजय नाना धोंडगे नाशिक , १४ जानेवारी बुधवार कविराज झावरे अहिल्यानगर , १५ जानेवारी गुरुवारी संतोष आढावणे बुलढाणा , १६ जानेवारी शुक्रवारी योगीराज महाराज गोसावी पैठण, १७ जानेवारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## तुकाराम राठोड यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा शिक्षण क्षेत्रातील मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार बीड येथील तुकाराम राठोड सर शेरी बोरखडी, यांना जाहीर करण्यात आलेला होता. नुकत्याच बीड येथे पार पडलेल्या भव्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते तुकाराम राठोड सर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्कार ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदर्श भक्तीचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे गोपी : ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर



### विडा येथे साधु शिवरामपुरी पुण्योत्सव उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

भक्तीचे नवविधा प्रकार आहेत मात्र सूक्ष्म देहाने कृष्ण तत्त्वाशी पूर्णत:एकरूप झाल्याचे एकमेव उदाहरण म्हणजे गोपी असल्याचे प्रतिपादन ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी प्रति वर्षा प्रमाणे आयोजित श्री.तपोनिधी साधू शिवरामपुरी महाराज यांच्या पुण्योत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या किर्तना प्रसंगी केले आहे. केज तालुक्यातील विडा येथे तपोनिधी साधू शिवरामपुरी महाराज यांच्या पुण्योत्सवाच्या निमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली.यावेळी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या हरीबिन रही या न जाये जिहिरा कब की टाडी देखे राहा,क्या मेरे लाल कवन चुकी भई,क्या मोहीपासिती बेर लगाई,कोई सखी हरी जावे बुलावन बार ही डारूं उसपर तन,तुका प्रभु कब देखें पाऊं,पासीं आऊ फेर न जाऊ या गवळण पर प्रकरणातील अभंगावर महाराजांनी निरूपण केले.आपल्या प्रिय आराध्याचे विस्मरण अथवा विरह झाला असता अत्यंत व्याकुळ किंवा दु:खी होणे हे भक्तीचे द्योतक असून ज्ञानोत्तर भक्ती करणाऱ्या भक्ताच्या अंत:करणाची अवस्था अशीच असते तसेच भक्ती ही परम प्रेमस्वरूप असावी.तर आदर्श भक्ती म्हणजे गोपींच्या भक्तीसारखी एवढीच उपमा दिली जाते असे भक्तीचे ▶▶ उर्वरित पान २ वर